दिनांक :    .०२.२०२०

**प्रति,**
**मा. केंद्रीय गृहमंत्री,**
**भारत सरकार, नवी देहली.**

**विषय : देशविरोधी कारवायांमध्ये गुंतलेल्या आणि देशभरात 'नागरिकत्व सुधारणा कायद्या'च्या विरोधात हिंसाचार घडवून आणणाऱ्या 'पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया' या जिहादी संघटनेवर बंदी घालण्याविषयी....**

महोदय,

'नागरिकत्व सुधारणा कायद्या'च्या विरोधात हिंसाचार केल्याच्या प्रकरणी उत्तरप्रदेश पोलिसांनी 'पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया' (पी.एफ्.आय.) या जिहादी संघटनेच्या १०८ कार्यकर्त्यांना अटक केली. पी.एफ्.आय. ही संघटना उत्तरप्रदेशाच्या संभल, मुझफ्फरनगर, लक्ष्मणपुरी आणि शामली या जिल्ह्यांमध्ये सक्रीय आहे. 'नागरिकत्व सुधारणा कायद्या'च्या विरोधात उत्तरप्रदेशात दंगल आणि तोडफोड करण्यात या संघटनेचे सदस्य सक्रिय आहेत. नुकतेच बिजनौर येथून ५ जणांना अटक करण्यात आली. हे सदस्य शाहीनबाग आंदोलन चिघळवण्यासाठी, आंदोलकांना प्रक्षुब्ध करण्यासाठी, तसेच आंदोलनासाठी आर्थिक साहाय्याची जुळवाजुळव करण्यासाठी सक्रीय झाले होते. या संघटनेच्या कार्यकर्त्यांनी 'नागरिकत्व सुधारणा कायदा' आणि 'राष्ट्रीय नागरिक नोंदणी' अभियानाच्या विरोधात लोकांना भडकवण्याचे काम केले असल्याचे पुरावे मिळाले आहेत. त्यामुळे उत्तरप्रदेश सरकारने केंद्रशासनाकडे पी.एफ्.आय. संघटनेवर बंदी घालण्याची शिफारस यापूर्वीच केली आहे.

'पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया' ही एक कट्टर इस्लामिक संघटना असून वर्ष २००६ मध्ये स्थापन करण्यात आली होती. देशात बंदी घालण्यात आलेली आतंकवादी संघटना 'सिमी'च्या आतंकवाद्यांनी पी.एफ.आय.च्या कार्यकर्त्यांना प्रशिक्षण दिल्याचे काही घटनांतून समोर आले आहे. केरळ येथील या संघटनेचे कार्यकर्ते 'इसिस'साठी काम करतात. तसेच या संघटनेच्या कार्यकर्त्यांवर 'लव्ह जिहाद'ला प्रोत्साहन दिल्याचे पुरावेही 'एन.आय.ए.'कडे आहेत. वर्ष २०१० मध्ये या संघटनेच्या कार्यकर्त्यांनी प्रोफेसर टी.जे. जोसेफ यांचा इस्लाम पंथाच्या प्रेषितांच्या विरोधात वक्तव्य केल्याने त्यांचा हात तोडला होता. या संघटनेच्या अनेक कार्यकर्त्यांवर भाजप, संघ, तसेच हिंदुत्वनिष्ठ कार्यकर्त्यांच्या हत्या केल्याचे आरोप आहेत. पी.एफ्.आय.सारख्या संघटनांच्या माध्यमातून जिहादी कारवाया करणाऱ्यांवर जर वेळीच वचक बसला नाही, तर पुढे देशात आतंकवादी कृत्यांमध्ये वाढच होत राहिल. देशात कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी 'पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया' या संघटनेवर बंदी घालायला हवी, या मागणीसाठी या दिवशी .. या ठिकाणी राष्ट्रीय हिंदू आंदोलन करण्यात आले.

आपला विश्वासू,

स